# <u>परिपत्रक 269</u>

विषय:- कार्यालयीन जागेचा कर्मचाऱ्यांनी रहाण्यासाठी
करण्यात येत असलेला गैरवापर.

असे निदर्शनास येते की, काही कार्यालयात तेथील कर्मचारी कार्यालयाच्या जागेचा रहाण्यासाठी सर्रास वापर करीत असतात. कार्यालयाचे शिस्तीचे दृष्टीने अशा तऱ्हेने कार्यालयात रहाणे योग्य नाही.

त्याचप्रमाणे शासनाचे नियमाप्रमाणे कार्यालयामार्फत घरभाडे भत्ता घेऊनही कार्यालयाच्या जागेचा उपयोग रहाण्यासाठी करणे म्हणजे एक प्रकारे कार्यालयाला फसविण्यासारखे आहे.

अशा परिस्थितीत यापुढे कार्यालयीन जागेचा रहाण्यासाठी कोणीही वापर करु नये याबाबतची दक्षता सर्व विभागीय अधिकाऱ्यांनी घ्यावी व कोणी कर्मचारी कार्यालयाचा निवास स्थानासारखा उपयोग करीत आहे असे आढळल्यास वेळीच त्यांना पायबंद घालण्यांत यावा न पेक्षा त्यांनाच त्याबद्दल जबाबदार धरण्यात येईल.

मुंबई.
दिनांक 5/8/89

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत,
सर्व विभागीय अधिकारी,